**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.६७/२०२६**
**निशाणी क्रमांकः– १७ खाली**
**प्रविण चव्हाण वि. इंदु चव्हाण.**

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्रमांक १ यांची शपथेवरील जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नावः– प्रविण इंदल चव्हाण

**सरतपास अर्जदार तर्फे वकील श्री. रोशन भोईर यांचे मार्फत सुरू**

**०१.** सदर प्रतिज्ञापत्रातील मजकूर माझे सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे व तो बरोबर आहे व तो वाचल्यानंतर मी त्यावर सही केली. माझ्या वडिलांच्या मृत्यूच्या दाखल्याची झेरॉक्स प्रत मी दाखल केलेली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१८** देण्यात येत आहे. माझ्या वडिलांच्या नावावर असलेल्या मालमत्तेच्या नोदणीकृत खरेदीखत क्र.१७४२/२०१२ ची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.१९** देण्यात येत आहे. आईच्या नावाचे रेशकार्डचे झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे व मुळ प्रत मी सोबत आणली आहे. मुळ वरून झेरॉक्स पडताळून पाहिली ती बरोबर आहे. झेरॉक्सला **नि.२०** देण्यात येत आहे.

**०२.** दैनिक रायगड नगरी या पेपरमध्ये दि.३/२/२०२६ रोजी जाहिर नोटीस प्रकाशित केली होती तो पेपर मी दाखल केलेला आहे. त्यास **आर्टिकल अ** देण्यात येत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**उलटतपास सामनेवालातर्फे स्वत: नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAJESH YASHWANTRAO KHANDARE

Digitally signed by RAJESH YASHWANTRAO KHANDARE
Date: 2026.03.12 18:54:31 +0530

**ठिकाणः पनवेल** **(आर. वाय.खंडारे)**

**दिनांकः– ११/०३/२०२६.** **५वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, पनवेल**